MHPU200002032012

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | ०४/०२/२०१२ |
| नोंदणी तारीख | : | ०४/०२/२०१२ |
| निकाली तारीख | : | ०३/०७/२०२६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| कालावधी | : | व. | म. | दि. |
| | | १४ | ०४ | २९ |

| | |
|---|---|
| <u>घोडनदी, ता. शिरुर, जि. पुणे येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, यांचे न्यायालयात</u> | |
| **पिठासीन अधिकारी चंद्रमोहन मो. खारकर** | |
| **न्यायनिर्णयाची तारीख** | ०३/०७/२०२६. |
| **संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक** | ५४/२०१२. |
| **निशाणी क्रमांक** | १९. |
| **प्रथम खबर क्रमांक** | ३७/२०१० भारतीय दंड संहितेचे कलम २७९, ३३७ आणि मोटर वाहन कायद्याचे कलम १८४ अंतर्गत. |
| **पोलीस ठाणे** | शिक्रापुर, ता. शिरुर, जि. पुणे. |

| | | |
|---|---|---|
| तक्रारदार | | **<u>महाराष्ट्र शासन</u>** तर्फे<br>पोलिस ठाणे अधिकारी,<br>शिक्रापुर, ता. शिरुर, जि. पुणे. |
| अभियोग पक्षातर्फे | | **श्री. एस. एम. आरणे, विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता.** |
| आरोपी | | **विनायक लक्ष्मण शेळके,**<br>वय:– २५ वर्षे, व्यवसाय:– चालक,<br>रा. पिंपळे धुमाळ, ता. शिरुर, जि. पुणे. |

| आरोपी तर्फे | | **विद्वान वकील श्री. जी.ई. दरेकर.** |
|---|---|---|

| **भाग "ब"** | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | २९/०४/२०१० |
| प्रथम खबरची तारीख | १८/११/२०१० |
| अंतीम आरोपपत्र दाखल केल्याची तारीख | ०४/०२/२०१२ |
| दोषारोपपत्राची तारीख | ३१/०८/२०२३ |
| पुरावा नोंदविणे प्रारंभ केल्याची तारीख | ०४/०९/२०२३ |
| न्यायनिर्णयाची राखीव असलेली तारीख | –– |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०३/०७/२०२६ |
| गुन्हासाठी शिक्षा, असल्यास | काहीही नाही. |

**आरोपीचा तपशील.**

| अ.क्र. | आरोपीचे नाव | अटकेचा दिनांक | जामिनाचा दिनांक | दाखल झालेले गुन्हे | दोषी किंवा निर्दोष | झालेली शिक्षा | संपरीक्षे दरम्यान आरोपीचा अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | विनायक लक्ष्मण शेळके | ३१/०१/२०१२ | ३१/०१/२०१२ | भा.दं.वि. याचे कलम २७९, ३३७ व मोटर वाहन कायद्याचे कलम १८४ अन्वये. | निर्दोष | निरंक | निरंक |

## :: <u>न्या य नि र्ण य</u> ::
## ( जाहीर दिनांक – ०३/०७/२०२६ )

प्रस्तुत प्रकरणात आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम २७९, ३३७ व मोटर वाहन कायद्याचे कलम १८४ प्रमाणे संपरिक्षा करण्यात आली.

०२. <u>अभियोग पक्षाचे कथन संक्षिप्तपणे खालील प्रमाणेः</u>

दिनांक २९/०४/२०१० रोजी १२.१५ वाजताचे सुमारास आरोपीने आपले ताब्यातील पिकअप जीप क्र.एम.एच.–१२–एफ.डी.–६४८ (सदर पिकअप हिस इथुन पुढे संक्षीप्तपणे ''***उपरोक्त नमुद अपघातग्रस्त पिकअप***'' असे संबोधण्यात आलेले आहे) ही शिक्रापुर ते पाबळ रोडने पाबळ बाजुकडे रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन ती हयगयीने, अविचाराने चालवुन घेवुन जात असतांना मोटारसायकल क्र.एम.एच.–१२–ई.यु.–७९५१ (सदर मोटारसायकल हिस इथुन पुढे संक्षीप्तपणे ''***उपरोक्त नमुद अपघातग्रस्त मोटारसायकल***'' असे संबोधण्यात आलेले आहे) हिस ओव्हरटेक करुन जात असतांना फाकळ्याची धडक मोटारसायकलला लागली व त्यावरील चालक नामे संतोष माधव ठोसर व मागे बसलेली माधुरी शांताराम शिंदे यांना किरकोळ दुखापती होणेस कारनीभुत झाला. सबब, फिर्यादीने दिनांक १८/११/२०१० रोजी घटनेची फिर्याद दिली.

०३. फिर्यादीच्या अनुषंगाने आरोपीविरूध्द गु.र.नं.३७८/२०१० भारतीय दंड विधान, १८६० चे कलम २७९, ३३७ व मोटर वाहन कायद्याचे कलम १८४ प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला. गुन्हयाचा तपास सहा. फौजदार श्री. एस.एन. महाजन, यांच्याकडे देण्यात आला. तपासादरम्यान आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळुन आलेनंतर आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

०४. आरोपीविरूध्द दोषारोपपत्र दाखल झाल्यानंतर समन्स काढण्यात आले. आरोपी समन्स स्विकारून न्यायालयात हजर झाला. आरोपीविरूध्द निशाणी १२ लगत

भारतीय दंड विधान, १८६० चे कलम २७९, ३३७ व मोटर वाहन कायद्याचे कलम १८४ प्रमाणे दोषारोप नोंदवण्यात आला. सदर दोषारोप आरोपीस त्याचे मातृभाषेत वाचून दाखविण्यात आले. आरोपीने सदरचे दोषारोप नाकबूल केले व संपरिक्षेस जाण्याची तयारी दर्शविली.

**०५.** अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी खालील साक्षीदार तपासले.

| भाग “क” | | | |
|---|---|---|---|
| **अ. अभियोग पक्षाने तपासलेल्या साक्षीदाराची यादी** | | | |
| **अ. क्र.** | **नाव** | **साक्षीदाराचे स्वरुप** | **नि. क्र.** |
| अ.सा.क्र. १ | संतोष माधव ठोसर | जखमी साक्षीदार | १७ |

| **ब. बचाव पक्षाने तपासलेल्या साक्षीदाराची यादी** | | | |
|---|---|---|---|
| **अ. क्र.** | **नाव** | **साक्षीदाराचे स्वरुप** | **नि. क्र.** |
| **:: नि रं क ::** | | | |

| **क. न्यायालयाने स्वतः तपासलेल्या साक्षीदाराची यादी** | | | |
|---|---|---|---|
| **अ. क्र.** | **नाव** | **साक्षीदाराचे स्वरुप** | **नि. क्र.** |
| **:: नि रं क ::** | | | |

**०६.** अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी खालील दस्ताऐवजावर आपली भिस्त ठेवली.

| भाग "क" | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्षाने सादर केलेल्या दस्ताऐवजांची यादी** | | |
| **अ. क्र.** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
| १ | १८ | खबरी जबाब |

०७. बचाव पक्षाने खालील दस्ताऐवजावर आपली भिस्त ठेवली.

| भाग "क" | | |
|---|---|---|
| **बचाव पक्षाने सादर केलेल्या दस्ताऐवजांची यादी** | | |
| **अ. क्र.** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
| **:: नि रं क ::** | | |

०८. न्यायालयाने स्वतः खालील दस्ताऐवजावर दाखल केले.

| भाग "क" | | |
|---|---|---|
| **न्यायालयाने स्वतः दाखल केलेल्या दस्तांऐवजाची यादी** | | |
| **अ. क्र.** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
| **:: निरंक ::** | | |

०९. निशाणी १ वरील आदेशान्वये अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

**१०.** दिनांक २४/०६/२०२६ रोजी निशाणी क्र.१ वर आदेश पारीत करुन अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला व आरोपीचे फौजदारी प्रकिया संहिता, १९७३, कलम ३१३ प्रमाणेचे निवेदन नाहीचा आदेश पारीत करण्यात आला.

**११.** युक्तीवाद ऐकला. खालील निर्धारण बिंदु माझे विचारार्थ उपस्थित झाले. त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसे सहीत खालील प्रमाणे नोंदवितो.

| अ.क्र. | निर्धारण बिंदु | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, दि. २९/०४/२०१० रोजी १२.१५ वाजताच्या सुमारास मौजे जातेगाव बु., बोरमळा, मुक्ताई मंदीराजवळ, ता.शिरुर, जि. पुणे गावचे हद्दीत आरोपीने उपरोक्त नमुद अपघातग्रस्त पिकअप ही मानवी जिवित धोक्यात येईल अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत अगर क्षती पोचण्याचा संभव असेल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने सार्वजनिक रस्त्यावर चालवत असताना आढळुन आला काय ? | नकारार्थी |
| ०२. | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, वर नमुद तारीख, ठिकाण व वेळी आरोपीने त्याच्या ताब्यातील उपरोक्त नमुद अपघातग्रस्त कार ही हयगयीने, अविचाराने, रहदारीचे नियमांकडे दुर्लक्ष करुन भरधाव वेगात चालवुन उपरोक्त नमुद अपघातग्रस्त मोटारसायकल वरील चालक नामे संतोष माधव ठोसर व मागे बसलेली माधुरी शांताराम शिंदे यांना किरकोळ जखमी केले काय? | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| ०३. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, वर नमुद वेळी, दिवशी व ठिकाणी आरोपीने आपल्या ताब्यातील उपरोक्त नमुद अपघातग्रस्त पिकअप ही मानवी जिवीतास किंवा इतरांची व्यक्तीगत सुरक्षीतता धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे, हयगयीने व भरवेगाने चालविली काय ? | **नकारार्थी** |
| ०४. | कोणता गुन्हा सिध्द होतो ? | **नकारार्थी** |
| ०५. | अंतिम आदेश काय ? | **आरोपीची निर्दोष मुक्तता.** |

:: **कारणमिमांसा** ::

**निर्धारण बिंदु क्रं १ ते ३ करीता:**

**१२.** निर्धारण बिंदु क्र. १ ते ३ हे समान तथ्यांवरती व पुराव्यावरती आधारीत असल्यामुळे त्यांचे विवेचन मी एकत्रीतरित्या करीत आहे.

**१३.** आरोपीविरुध्द ठेवलेले आरोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांची साक्ष निशाणी क्र.१७ वर तपासण्यात आलेली आहे. सदर साक्षीदार यांनी मौखिक पुराव्यात असे कथन केले आहे की, दिनांक २९/०४/२०१० रोजी दुपारी १२.३० वाजता शिक्रापुर पासुन दोन कि.मी. अंतरावर बोरमळा येथे सदरची घटना घडली होती. सदर दिवशी सदर साक्षीदार व त्यांची मेव्हणी नामे माधुरी शांताराम शिंदे असे उपरोक्त नमुद अपघातग्रस्त मोटारसायकल यावरुन जात असतांना पाठीमागुन

येणारे उपरोक्त नमुद अपघातग्रस्त पिकअप हिने सदर साक्षीदार यांचे मोटारसायकलला धडक दिली व त्यामुळे ते खाली पडले. सदर अपघातामध्ये सदर साक्षीदार यांच्या उजव्या खांद्याला खरचटले व मुका मार लागला. माधुरी शिंदे यांच्या पायाला दुखापत झाली होती. त्यावेळी समोरुन गाडीवर येणार सुनिल होळकर यांनी सदर साक्षीदार यांना ओळखले व पिकअप चालक यांस थांबवुन सदर साक्षीदार व माधुरी शिंदे यांना वैद्यकीय उपचाराकामी सुर्या हॉस्पीटल, शिक्रापुर येथे नेले. अपघातानंतर शिक्रापुर पोलीसांनी दिनांक २९/०४/२०१० रोजी घटनेबाबत खबरी जबाब नोंदविला होता.

**१४**. अभिलेखावरील मौखिक तथा कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता, घटनेवेळी अपघातग्रस्त पिकअप कोण चालवित होते त्या चालकास साक्षीदार क्र.१ हे ओळखु शकत नाही. घटनास्थळ हे वर्दळीचे ठिकाण असल्याचे तेथे वाहनांचा वेग हा साधारण असतो हे सदर साक्षीदार यांनी उलटतपासादरम्यान मान्य केलेले आहे. सदर साक्षीदार हे अपघातातील प्रत्यक्षदर्शी व जखमी साक्षीदार असुन देखील त्यांना अपघात कसा झाला होता हे निश्चितपणे सांगता येत नाही. अपघात झाला त्यावेळी सदर साक्षीदार यांनी पिकअपचा क्रमांक पाहिला नव्हता. सदरहु पिकअपबद्दल माहिती त्यांना सुनिल होळकर यांचेकडुन समजली. सदर साक्षीदार यांना अपघाताबद्दल निश्चित माहिती नसल्याने त्यांची साक्ष विश्वासार्ह वाटत नाही. अभियोगपक्षास पुरेशी संधी देवुन देखील सुनिल होळकर, इतर प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, घटनास्थळ पंच, तपासी अधिकारी व इतर स्वतंत्र साक्षीदार यांची साक्ष नोंदविलेली नाही. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेल्या केवळ साक्षीदार क्र.१ यांच्या साक्ष वरुन आरोपीनेच गुन्हा केला हे सिध्द होत नाही. घटनास्थळ वर्दळीचे असुन देखील अभियोगपक्षातर्फे एकही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांची साक्ष नोंदविण्यात आलेली नाही.

**१५.** प्रस्तुत प्रकरणामध्ये घटनेवेळी आरोपीनेच अपघात केला हे शाबीत करणे अभियोगपक्षावर बंधनकारक आहे. सदर प्रकरणाचे अवलोकन केले असता, आरोपीनेच हा गुन्हा केला हे दर्शविणारा स्पष्ट व निर्विवाद पुरावा अभिलेखावर आणलेला नाही. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेल्या फिर्यादी यांची साक्ष आरोपीला दोषी धरण्याइतपत पुरेशी नाही. तसेच, अभियोगपक्षाच्या पुराव्यावरुन आरोपीनेच गुन्हा केल्याचे अभियोगपक्ष सिध्द करु शकलेला नाही. अभियोग पक्षाने आरोपीविरूध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम २७९, ३३७ व मोटर वाहन कायद्याचे कलम १८४ प्रमाणेचा गुन्हा सिध्द करण्यासाठी आवश्यक घटकांची पूर्तता केलेली नाही व सदरचा गुन्हा निसंशयरित्या आरोपीनेच केला ही बाब सिध्द केलेली नाही. **सबब मी निर्धारण बिंदु १ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवत आहे.**

**निर्धारण बिंदु क्रं. ४ करीता**:

**१६.** आरोपीविरूध्द कोणताही गुन्हा सिध्द होत नाही. सबब निर्धारण बिंदु क्र. १ ते ३ प्रमाणेचा गुन्हा सिध्द होत नाही. म्हणुन मी निर्धारण बिंदु क्र.४ चे उत्तर नकारार्थी नोंदवले आहे. करीता आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. **सबब निर्धारण बिंदु क्र. ५ करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.**

| :: **आ दे श** :: | |
|---|---|
| **०१.** | आरोपीची भारतीय दंड विधान, १८६० चे कलम २७९, ३३७ व मोटर वाहन कायद्याचे कलम १८४ प्रमाणे दंडनीय गुन्हयातून फौजदारी प्रक्रीया संहिता, १९७३ चे कलम २५५(१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

| | |
|---|---|
| **०२.** | आरोपीचा सध्याचा जामीन व जातमुचलका रद्द करण्यात येतो. |
| **०३.** | आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७ (अ) प्रमाणे पूर्तता करावी. |
| | (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.) |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by
CHANDRAMOHAN
MOHAN KHARKAR
Date: 2026.07.03
16:52:51 +0530

दिनांक: ०३/०७/२०२६.
स्थळ : घोडनदी.

**( चंद्रमोहन मो. खारकर )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
घाडनदी, ता. शिरुर, जि. पुणे.

शेरा -

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. न्यायनिर्णय फाईल मधील मजकूर हा मूळ न्यायनिर्णयातील मजकुराशी शब्द न शब्द सारखा आहे.

कोर्टाचे नाव – मे. सी.एम. खारकर
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, शिरुर जि.पुणे.

लघुलेखकाचे नाव. - व्ही. एम. घुंगरड

निकालाची तारीख – ०३/०७/२०२६

निकालपत्र सही केल्याची तारीख – ०३/०७/२०२६

निकालपत्र अपलोड केल्याची तारीख – ०३/०७/२०२६